# विद्यापीठात जगदीश खेबुडकरांचे दालन

## लवकरच मूर्त स्वरूप; खेबुडकरांचे साहित्य होणार जतन, भाषासंशोधकांना पर्वणी

ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : दिवंगत कवी आणि गीतकार जगदीश खेबुडकर यांची साहित्य-संपदा जतन करण्याचे कार्य शिवाजी विद्यापीठाने हाती घेतले आहे. विद्यापीठात लवकरच खेबुडकरांचे स्वतंत्र दालन साकारणार असून, यात खेबुडकरांचा जीवनप्रवास रसिकांना अनुभवता येईल. त्यांच्या पहिल्या कवितेपासून त्यांनी लिहिलेली गीते, पटकथा असा अलौकिक ठेवा या निमित्ताने भावी पिढ्यांसाठी उपलब्ध होईल.**

मराठी भाषा संशोधकांसाठीही हे दालन पर्वणी ठरेल. जगदीश खेबुडकर कुटुंबीय आणि विद्यापीठ प्रशासनाकडून आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे, लवकरच त्याला मूर्त स्वरूप येईल.

कोल्हापूरला कलानगरी अशी ओळख देणाऱ्या प्रतिभासंपन्न व्यक्तींमध्ये जगदीश खेबुडकर यांचा समावेश होतो. त्यांनी लिहिलेल्या गीतांनी मराठी चित्रपटांना आणि मराठी भाषेला वैभव मिळाले. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक वसंत पवार यांच्यापासून ते अलीकडच्या पिढीतील अजय-अतुल यांच्यापर्यंत सुमारे ४८ संगीत दिग्दर्शकांनी खेबुडकरांकडून आवर्जून गीते लिहून घेतली. 'आकाशी झेप घे रे पाखरा...', 'विठू माऊली तू माऊली जगाची...' या भक्तिगीतांपासून ते 'मला हो म्हणत्यात लवंगी मिरची...' अशा ठसकेबाज लावण्यांपर्यंत सर्व प्रकारची गीते त्यांनी लिहिली. याशिवाय मालिका, नाटके, चित्रपटांच्या पटकथा असे चतुरस्र लेखन खेबुडकरांनी केले. हा मोलाचा ठेवा जतन करून त्यावर अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यातून काव्य, भाषा याबाबतची अनेक महत्त्वपूर्ण माहिती, जगदीश खेबुडकरांनी केलेले निरनिराळे प्रयोग अभ्यासता येतील. खेबुडकर कुटुंबीय आणि शिवाजी विद्यापीठ यांनी या दालनाचा आराखडा बनवला आहे. या दालनात जगदीश खेबुडकर यांची गीते, पटकथा, संवाद, चित्रपटलेखन, नाटक, मालिकांची शीर्षकगीते यांसह त्यांच्या वस्तू, त्यांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग, आठवणी वेगवेगळ्या स्वरूपात असतील. याबाबतचा आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे. जागेची निश्चिती करून प्रत्यक्ष दालन उभारणीला प्रारंभ होईल.

### मिळालेले पुरस्कार

- व्ही. शांताराम स्मृती जीवनगौरव पुरस्कार
- शिवाजी सावंत पुरस्कार
- बालगंधर्व पुरस्कार
- पी. सावळाराम पुरस्कार
- राम कदम पुरस्कार





### खेबुडकरांची साहित्य संपदा

- चारशे मराठी चित्रपटगीते
- चार हजार कविता
- २५ पटकथा, संवाद
- ५० लघुकथा
- ५ नाटके
- १० खंडकाव्य
- ४ मालिका (दूरदर्शन)
- ४ टेलिफिल्म
- ५ मालिका गीते

**हाडाचा शिक्षक, हळव्या मनाचा कवी, अर्थपूर्ण गीतांचा रचनाकार, सामाजिक जाणिवांचा लेखक अशा सर्व दृष्टिकोनांतून जगदीश खेबुडकर हे महान होते. त्यांच्या साहित्याचे जतन करण्यासाठी विद्यापीठ हे अत्यंत योग्य ठिकाण आहे. या दालनाच्या माध्यमातून त्यांच्या प्रतिभेचा रसास्वाद सर्वसामान्यांना घेता येईल. विद्यापीठ प्रशासनही याबाबत सकारात्मक असून लवकरच हे दालन साकारले जाईल.**

**- कविता खेबुडकर**, जगदीश खेबुडकर यांच्या कन्या.

**जगदीश खेबुडकर हे कोल्हापूरचे अत्यंत प्रतिभावान व्यक्तिमत्त्व होय. त्यांचा साहित्यठेवा दालनाच्या माध्यमातून जतन करण्याचे शिवाजी विद्यापीठाने ठरवले आहे. हा प्रस्तावित प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा, यासाठी प्रयत्नशील आहोत. खेबुडकर यांच्या कुटुंबीयांशी चर्चा करून अंतिम आराखडा ठरवला जाईल. या दालनाचा उपयोग विद्यार्थी, भाषासंशोधक, चित्रपटअभ्यासक यांना निश्चित होईल.**

**- डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

# चित्रपटसृष्टीला मनुष्यबळ निर्मितीसाठी करार उपयुक्त

– नितीन देसाई

## शिवाजी विद्यापीठाचा एनडीज् आर्ट वर्ल्डसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
चित्रपटसृष्टीला विविध २८ प्रकारच्या कलाकौशल्यांची गरज असते. या सर्व कलाप्रकारांत कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाला संधी खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. हे मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठासमवेत झालेला सामंजस्य करार अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलादिग्दर्शक आणि एनडीज् आर्ट वर्ल्डचे संस्थापक अध्यक्ष नितीन चंद्रकांत देसाई यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि एनडीज् आर्ट वर्ल्ड यांच्यामध्ये विविध कौशल्य विकास व प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार झाला. त्यावेळी देसाई बोलत होते.



कोल्हापूर : एनडीज् आर्ट वर्ल्डसमवेत सामंजस्य करार प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासह कलादिग्दर्शक नितीन देसाई, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह अन्य मान्यवर (छाया : एस. अली)

यावेळी देसाई म्हणाले, हा करार केवळ पुस्तकी स्वरूपाचा नाही, तर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह काम शिकवून तयार करण्याला प्राधान्य राहणार आहे. या कौशल्य विकास कार्यक्रमाला कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पात्रतेची अगर वयाचीही अट असणार नाही. ज्या कोणाला आपल्याकडील उपजत कौशल्यांचा विकास करावयाचा आहे किंवा एखादे कौशल्य शिकून त्यामध्ये करिअर करण्याची इच्छा आहे, अशा प्रत्येक विद्यार्थ्याला इथे प्रशिक्षणाची संधी देण्यात येईल. कोल्हापूरच्या तर मातीत प्रचंड कस आहे आणि मुलामुलींत भरपूर कला आहे, त्यामुळे या परिसरातून तर कलाकारांची मोठी फौजच निर्माण करू शकतो.'

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाने विविध २८ प्रकारची कौशल्ये केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे आणि मनोरंजनाचे रूपांतर रोजगारात करण्याचे काम या माध्यमातून होणार आहे. पुढे त्यातूनच कलेचे रूपांतर व्यवसायात करणेही शक्य होणार आहे. याप्रसंगी कोल्हापूरचे उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

### चित्रपटसृष्टीची पायाभरणी

कोल्हापूर हे चित्रपटसृष्टीचे माहेरघर असल्याचे सांगून देसाई म्हणाले, बाबूराव पेंटर यांनी पहिला स्वदेशी कॅमेरा याच भूमीत बनविला. त्यांच्यासह भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार या मातीत घडले. त्यांनी चित्रपटसृष्टीची खऱ्या अर्थाने पायाभरणी केली. त्यांना इथल्या कुशल, प्रयोगशील कलाकारांची आणि मनुष्यबळाची मोठी साथ लाभली. त्यामुळे चित्रपटसृष्टीमध्ये कोल्हापूरची स्वतंत्र अशी ओळख आहे.